पुढारी E-PAPER

Sunday, September 04, 2005 1:40:00 AM

# समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा : ना.केसरकर

**दोडामार्ग : प्रतिनिधी**

ज्या समाजात आपण राहतो त्याच समाजाच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतात. समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. यासाठी समाजाची सेवा केली पाहिजे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेंवून आपण एक चांगला नागरिक बनू शकतो असे मत पालकमंत्री दीपक केसरकर यांनी मांडले.

दोडामार्ग येथे मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



**दोडामार्ग : महाविद्यालयात पालकमंत्री दीपक केसरकर यांचा सत्कार करताना भाई परमेकर. सोबत प्राचार्य डॉ. पाटील व अन्य (छाया : रत्नदीप गवस)**

ना.दीपक केसरकर पुढे म्हणाले, विविध आपत्तींना सामोरे जाण्याचे मनोबल प्रत्येकात निर्माण झाले पाहिजे. त्यामुळे समाजाविषयी आपुलकीची भावना निर्माण होते. जिल्ह्याचा पर्यटन विकास झाला पाहिजे. यासाठी तरुणांनी प्रशिक्षित होवून पुढाकार घेतला पहिजे. महात्मा गांधींनी खेड्याकडे चला हा संदेश दिला. खेडी स्वयंपुर्ण झाली तरच देश स्वयंपुर्ण होईल. हे त्यांनी जाणले होते. आज ही त्याची आवश्यकता आहे. म्हणून प्रत्येक तरुणांनी आपल्या गावातहल गरजा ओळखून त्या पुर्ण करण्याचा प्रयत्न करावा. गावे बदलली पाहिजेत. हा बदल करण्याची क्षमता तरुणांमध्ये आहे. देशाच्या विकासाची तरुणांच योगदान महत्वाच असून मात्र हा विकास साधण्यासाठी निसर्ग आणि उद्योगांची योग्य सांगड घालावी. यावेळी त्यांनी महाविद्यालयाला सर्व ते सहकार्य करण्याचे व आमदार निधीतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी ५ लाख रुपये निधी देण्याचे आश्वासन दिले. संस्था सदस्य भाई परमेकर, प्रांताधिकारी व्ही. जी. इनामदार, तहसिलदार संतोष जाधव, व्यवस्थापन समिती सदस्य बाबुराव धुरी, सूजन कोरगावकर, उपसभापती आनंद रेडकर, मुंबई विद्यापीठ एन. एस. एस. विभाग समन्वयक प्रा. वि. एस. बिड्ये उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. एस. यु. देरेकर व प्रा. आर. ए. मोरे यांनी मेहनत घेतली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव व आभार प्रा. मोरे यांनी मानले.